९५० 1


महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.** ०२०-२६१२२६०३/२६१२२०७६ E-mail ID: dirtpvd.pune@maharashtra.gov.in

ddtp.ho@maharashtra.gov.in do_tpv1@rediffmail.com


---

जा.क्र.प्रा. वि.यो.चाकण न.प. /जि.पुणे/टिपीव्ही-१/ ५५९८ दि.१५.१०.२०२४.

प्रति,

मा.प्रधान सचिव,
नगर विकास विभाग (नवि-०१),
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय:-** **प्रारुप विकास योजना, चाकण , जि.पुणे .**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० चे तरतूदी अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेबाबत....

**संदर्भ:-** नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांचे संचालनालयामार्फत शासनास उद्देशून पत्र क्र. ससनंर/प्रा.वि.यो.चाकण/कलम३०(१)/१२७०, दि.२१.०९.२०२३. (संचालनालयास प्राप्त दि.२५.०९.२०२३.)

महोदय,

शासनाचे नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमयुपी-२०१२/प्र.क्र.६६/ पुर्नबांधणी-२२/नवी-१९,दि.०६.०४.२०१५ अन्वये चाकण नगर परिषदेची स्थापना झालेली आहे. चाकण नगर परिषदेचे एकूण क्षेत्र १६८०.५४ हेक्टर इतके असलेबाबत विकास योजना अहवालात नमूद आहे. सदर क्षेत्राकरिता विकास योजना तयार करणेबाबत चाकण नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) चे तरतूदीन्वये दि.२१.०३.२०१७ रोजी सर्वसाधारण ठराव क्र. २ अन्वये इरादा घोषित केला आहे.

त्यानंतर विकास योजना तयार करणेबाबतचा सर्वसाधारण घटनाक्रम पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | नगर रचना अधिकारी म्हणून सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा यांची नियुक्ती | चाकण नगरपरिषदेचे आदेश क्र.१०७४, दि.११.०८.२०१७ |
| २ | विद्यमान जमीन वापर नकाशा चाकण नगरपरिषदेकडे सुपूर्त | दि.२५.०१.२०१८ |
| ३ | विकास योजना जनतेच्या सूचना / हरकती मागविणेसाठी उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वये प्रसिध्द करणेत आली. | दि.०५.०७.२०१९ (वाढीव मुदतीमध्ये) |
| ४ | प्राप्त सूचना / हरकतींचे अनुषंगाने, नियोजन समितीचा अहवाल चाकण नगरपरिषेदस सादर | दि.०५.११.२०२० |

उपरोक्त कार्यवाहीनंतर चाकण नगरपरिषदेने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) अन्वये फेरबदलाची सूची प्रसिध्द करणे व विकास योजना कलम ३०(१) अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करणेच्या कर्तव्यामध्ये कसूर केलेला आहे. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम २८(४) ते ३० अन्वयेची सर्व कर्तव्ये विहित मुदतीत पार पाडण्याकरिता सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी दि.२४.०३.२०२३ रोजीचे आदेशान्वये सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा यांची नियुक्ती केलेली आहे.

नियुक्त अधिकारी उक्त अधिनियमाचे कलम ३०(१) चे तरतूदी अन्वये शासनास मंजुरीकरीता सादर केलेल्या प्रारूप विकास योजनेच्या अनुषंगाने संचालनालयाकडे प्राप्त सूचना हरकत अर्ज, नियुक्त अधिकारी यांनी घेतलेले निर्णय इ. चा विचार करुन प्रारुप विकास योजनेबाबत छाननी करणेत आली आहे. सदर छाननी अहवाल पुढीलप्रमाणे नमूद प्रपत्रांसह मान्यतेस्तव सोबत सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | **प्रपत्र-अ** | वैधानिक कार्यवाहीबाबतचा तपशील. |
| २. | **प्रपत्र-ब** | प्रारुप विकास योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधांचा तपशिल. |
| ३. | **प्रपत्र -क** | प्रारुप विकास योजनेबाबत प्राप्त हरकती / सूचनांच्या अनुषंगाने नियोजन समितीचे अहवालावर उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये नियोजन प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाबाबत संचालनालयाचे अभिप्राय. |
| ४. | **प्रपत्र -ड** | संचालनालयाने सुचविलेले बदल |
| ५. | **प्रपत्र क-१** | प्रारुप विकास योजना चाकण, जि.पुणे, अनुषंगाने प्राप्त हरकत/ सुचनांच्या अनुषंगाने नियोजन प्राधिकरणाने अमान्य केलेल्या सूचना/हरकतींचा तपशील. |
| ६. | **प्रपत्र क-२** | प्रारुप विकास योजनेबाबत शासनास/संचालनालयाकडे प्राप्त झालेल्या मुदतबाह्य अर्जांवर संचालनालयाचे अभिप्राय. |
| ७. | **प्रपत्र-इ** | विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीबाबत संचालनालयाचे अभिप्राय. |
| ८. | **तक्ता क्र. १** | प्रारूप विकास योजना यानुसार विविध वापर विभागांचा तुलनात्मक तक्ता. |
| ९. | **तक्ता क्र. २** | शासकीय जमिनींबाबतचा तपशील. |

| | | |
|---|---|---|
| १०. | **तक्ता क्र. ३** | आरक्षणे प्रस्तावित करतांना विचारात घेण्यात आलेल्या बाबी. |
| ११. | **तक्ता क्र. ४** | नियोजन प्राधिकरणाने विकसित करावयाच्या आरक्षणांची माहिती. |
| १२. | **तक्ता क्र. ५** | नियोजन प्राधिकरणाव्यतिरिक्त अन्य समूचित प्राधिकरणासाठी प्रस्तावित आरक्षणांची माहिती. |

वर नमूद छाननी अहवाल तसेच वरील प्रपत्रांमधील नमूद अभिप्रायाचा शासनस्तरावर विचार होऊन प्रस्तुत विकास योजनेस उक्त अधिनियमाचे कलम-३१ चे तरतूदीन्वये मंजूरीबाबत पुढील कार्यवाही करणे उचित होईल, असे संचालनालयाचे मत आहे.

सोबतः वरीलप्रमाणे

आपला,

(मसूदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे)

**(अशोक कांबळे)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

**प्रत:**

१. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग,पुणे.
२. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.
३. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
४. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.